# University of Mumbai

**CONFIDENTIAL**
**URGENT/BY HAND.**
M.J. Phule Bhavan,
Examinations Section,
Vidyanagari Campus,
Mumbai - 400 098.

No. EX/ICC/2016-17/**52**

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की विद्यापीठ परीपत्रक क्र. EX/ICC/2015-16/28, दिनांक ०७/०१/२०१६ रोजीच्या परीपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे होताना दिसुन येत नाही आणि D.E.P.D.S. प्रणालीद्वारे प्रश्नपत्रिका स्वीकारण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष उभारले नसुन त्यांच्यामध्ये अनेक त्रुटी आहेत व अनेक महाविद्यालये ही बाब गांभिर्याने घेत नाहीत. आपणांस कळविण्यात येते की आपल्या महाविद्यालयात विद्यापीठाचे परीक्षा केंद्र असल्यास खालील गोष्टींची तातडीने पुर्तता करावी:

१. D.E.P.D.S. प्रणालीसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असावे व त्या कक्षामध्ये परीक्षे संबंधीची इतर कोणतीही कामे करू नयेत.

२. नियंत्रण कक्षात D.E.P.D.S. प्रणालीसाठी स्वतंत्र संगणक असावा व लॅपटॉप चा उपयोग करू नये.

३. संगणकाच्या बरोबर पाठीमागे सी.सी. टिव्ही कॅमेरा असावा जेणेकरून संगणकावर काय काम चालू आहे याची नोंद ठेवली जाईल.

४. सी.सी. टिव्हीचे कमीत कमी ३ महिन्यांचे Back Up परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठांस उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

५. विद्यार्थींना प्रश्नपत्रिका वितरीत करताना बैठक व्यवस्थेनुसार नियंत्रण कक्षात लिफाफ्यात सील बंद करून प्रत्येक वर्गात वितरीत करावीत व ती वर्गामध्ये विद्यार्थ्यांच्या समक्ष उघडण्यात यावीत आणि त्यावर किमान एका विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी व त्या वर्गासाठी असणा–या पर्यवेक्षकाची स्वाक्षरी असावी.

६. नियंत्रण कक्षात प्रवेश करणा–या प्रत्येकासाठी लॉग बुक मध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

७. नियंत्रण कक्षात स्वतंत्र दुरध्वनी फॅक्स सुविधेसह असावा ज्यांचा उपयोग आपातकालीन परिस्थितीत करता येईल.

नियंत्रण कक्षाची पहाणी करण्यासाठी विद्यापीठाची समिती आपल्या महाविद्यालयांस अचानकपणे कधीही भेट देऊ शकते.

...२...

# University of Mumbai



**<u>आपणांस असे सुचित करण्यात येते की प्रचलित पध्दतीनुसार परीक्षा सुरू झाल्यानंतर अर्ध्यातासानंतर विद्यार्थींना पेपर संपवुन बाहेर पडण्याची मुभा होती त्याऐवजी आता परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासानंतरच विद्यार्थ्याला बाहेर जाण्याची मुभा देण्यात यावी किंवा अर्ध्यातासानंतर विद्यार्थ्याला परीक्षा कक्षातुन बाहेर पडायचे असल्यास सदर विद्यार्थ्याकडुन उत्तरपत्रिकेसह प्रश्नपत्रिका जमा करून घ्यावी जेणेकरून सदर प्रश्नपत्रिका सोशल मिडिया वरून कोणासही संदेशीत करता येणार नाही.</u>**

वरील सर्व बाबींची पुर्तता न झाल्यास व एखादा अपप्रकार घडल्यास त्यांची जबाबदारी परीक्षा केंन्द्र असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/मुख्य मार्गदर्शक (Chief Conductor) यांची असेल याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०००९८.
दिनांक २५/०४/२०१६

(दिपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

प्रति,

सर्व शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक

<u>प्रत माहितीसाठी:–</u>

१. मा. कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
२. मा. कुलसचिव यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
३. मा. संचालक BCUD यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
४. सर्व उपकुलसचिव (परीक्षा भवन)
५. सर्व सहाय्यक कुलसचिव (परीक्षा भवन)